Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC (2021) with CGPA3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विद्यापीठ निधीवरील वर्ग ४ मधील सर्व सेवकांना कळविण्यात येते की, जे सेवक वर्ग-४ मधील प्रयोगशाळा परिचर या पदावर काम करण्यास इच्छूक आहेत, अशा सेवकांची सेवाजेष्ठता यादी तयार करण्याच्या अनुषंगाने अर्ज मागविण्यात येत आहेत. सदरचा अर्ज विभागप्रमुखांमार्फत सादर करणे आवश्यक आहे.

सदर पदाची शैक्षणिक अर्हता ही उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन अधिसूचना क्र. वेतन-२०१९ / प्र.क्र.२७८-भाग-१ / १९ / विशि-१ दि.२२/१२/२०२३ नुसार Those who have studied up to S.S.C. Class (With Physics-chemistry for library attendant) धारण करीत आहेत, अशाच सेवकांनी अर्ज करावेत.

**सदरची शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या सेवकांनी दि. 10 SEP 2026 -------/------/२०२६ अखेर कार्यालयीन वेळेत विभागप्रमुखांमार्फत अर्ज सादर करावेत.** तसेच सदर शैक्षणिक अर्हतेची नोंद सेवापुस्तकामध्ये असणे आवश्यक आहे. अर्जदारांनी अर्जासोबत साक्षांकित केलेली शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. जे सेवक मुदतीत व शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे जोडून अर्ज सादर करणार नाहीत त्यांचा सदर सेवाजेष्ठता यादीसाठी विचार केला जाणार नाही, याची संबंधित सेवकांनी नोंद घ्यावी. ज्या कर्मचाऱ्यांनी सदरचे परिपत्रक प्रसिध्द होण्याच्या अगोदर प्रयोगशाळा परिचर पदाच्या सेवाज्येष्ठता यादीमध्ये नाव समाविष्ट करणेबाबतचा अर्ज कार्यालयास सादर केला आहे, त्यांनी देखील सदर परीपत्रकानुसार अर्ज करावा, अन्यथा जेष्ठता यादीसाठी विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

कुलसचिव

**जा.क्र. एसयुके/आस्थापना-२ /** 751

**दिनांक :-** - 2 SEP 2026

**प्रति,**
**वर्ग-४ मधील सेवक.**

**प्रत:- माहितीस्तव.**

१. मा.कुलगुरू, मा.प्र-कुलगुरू, मा.कुलसचिव, मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ व मा. वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय.
२. सर्व अधिविभाग प्रमुख, संचालक, समन्वयक.
३. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा.कुलसचिव व समकक्ष अधिकारी
४. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
५. इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

**टीप :- सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व वर्ग ४ मधील सेवकांच्या निदर्शनास आणावे.**